Issue-7 Vol-1
Jan.- 2018

ISSN-2250-0383
IMPACT FACTOR - 0.421

SHODHANKAN

# SHODHANKAN

UGC APPROVED
(SL No. 2630) Journal No. 48999

Quarterly

International

Multi - Disciplinary

Refereed & Reviewed

Research Journal

Chief Editor
Dr. Radhakrishna Joshi

AnyScanner

CamScanner

( RNI MAH MUL 02988/13/1/2011 – TC VERIFICATION DATE 6/7/2011 )

**ISSN – 2250-0383**

**InternationalMultidisciplinaryReferred& ReviewedResearch Journal**

# SHODHANKAN

**CHIEF EDITOR : Dr. RADHAKRISHNA L. JOSHI**
**Associate Editors : 1. Dr. Kisan M. Ambade**

**EDITORS' BOARD**

Dr.Rajdev T.B.
Dr. Rajkumar Ghule
Dr. Patharkar S.V
Dr. Kanade Ashok
Dr. Dhale N.W.
Dr. Tarun Kalika
Dr. Varat T.M.
Dr. Khandat Maya

**INTERNATIONAL EDITORS' BOARD**

Dr. Bhatt Preeti, Rajasthan
Prof. Maduria Mahanta, Asam
Mr. Hrikesh Roy, Bengal
Prof. Reddy Shriniwas, Karnatak
Er. Chadraprakash Upadhyay
USA
Er. Ganjapurkar Sachin, Singapur
Er. SheldenRego, Australia
Prof. Patel Tarun, Gujrat
Prof. Padmawat C.S, Maharashtra.
Ms. Ventaka Aruna, A.P.
Er. Shaikh Naushad, Dubhai.
Dr. Pawar Abhay
India
Er. Dalvir Mall, Canada.

**Single Issue :Rs. 150/- Life Membership – Rs. 5000/-(Ten Years)**
**Each Paper : Rs.1100/- Institution Yearly Rs.1000/-**

**CHIEF ADVISOR – DR. DHARURKAR VIJAYKUMAR. L.**

AnyScanner

CamScanner

# INDEX


| अ.क्र. | शोधनिबंधाचे नांव | शोधनिबंधकाचे नांव | पान नं. |
|---|---|---|---|
| १ | शिवकालिन चलन व्यवस्था | डॉ. जोशी आर.एल. | १ ते ४ |
| २ | कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे सामाजिक कार्ये | प्रा. शिंदे सुवर्णा उध्दवराव | ५ ते ९ |
| ३ | इतिहासलेखन मीमांसा आणि 'जागृति' | प्रा. सचिन ज्ञानेश्वर मोरे | १० ते १३ |
| ४ | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा मुस्लीम समाज विषयक दृष्टीकोन | प्रा.डॉ.चौधरी डी,एम, | १४ ते १८ |
| ५ | शिवाजी महाराजांचे कृषिविषयक धोरण | प्रा. डॉ. व्ही.जी. वसु | १९ ते २१ |
| ६ | आंबेडकरी चळवळीतील आर्थिक स्थित्यंतराचा वेध | डॉ. माधव गायकवाड | २२ ते २८ |
| ७ | The Art of Teaching एक परिपुर्ण शिक्षण व संस्कार प्रणाली | प्रा.अविनाशजी भवर व सहकारी | २९ ते ३१ |
| ८ | महिला आरक्षण बदलत्या राजकारणाची दिशा | डॉ. तळेकर चंद्रशेखर काशीनाथ | ३२ ते ३४ |
| ९ | The Me Of War, Terrorism And Assassination In Frederick Forsyth's Novels | Sanjay Yohan Brahmane | ३५ ते ४० |
| १० | Importance Of Reader-Response Criticism In 20th Century | Patil Y.B., | ४३ ते ४५ |
| ११ | Future Of Teacher Education By Distance Mode | Dr. Vinod B. Kulkarni. | ४६ ते ५० |
| १२ | Independences Of Indian Judiciary | Mr. Mehkarkar G. S. | ५१ ते ५४ |
| १३ | Indian Democracy And Cast System | Dr.. Salunkhe J. C. | ५५ ते ५९ |
| १४ | Impact Of Education On Violence Against Women | Mrs. Asha Suratkal | ६० ते ६५ |
| १५ | Various Teaching Methods For Physical Education | Meher Prashant R | ६६ ते ६९ |
| १६ | Physico - Chemical Status Of Dhanorawaterbodies In Relation To Water Pollution | Ramesh N.Abdar | ७० ते ७५ |
| १७ | Analysis Of Land Use /Land Cover Using Remote Sensing Techniques: A Case Study Of Shrigonda Taluka | Jadhav Madhuri Sambhaji | ७६ ते ७९ |


AnyScanner

CamScanner

HISTORY
ISSN - 2250-0383
RNI-02988/13/01/2011-TC

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा मुस्लीम समाज विषयक दृष्टीकोण

प्रा.डॉ.चौधरी डी,एम,
दादा पाटील महाविद्यालय,कर्जत
ता.कर्जत ,जि. अहमदनगर
मो. ९७६६६२४९९५
Email-chaudhridattatray@gmail.com

प्रास्ताविक

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाचा चौफेर विकास घडवून आणला.आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपल्या शैक्षणिक,सामाजिक व आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करून त्यांची सार्वंगीण प्रगती घडवून आणणारे प्रजाहित दक्ष सत्ताधीश म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज होत. राजर्षी छत्रपती शाहू महाराज मराठा संस्थानिक असले तरी ते मराठयांचे राजे नव्हते. त्यांच्या संस्थानात असलेल्या हिंदू,जैन,मुस्लीम,पारशी,ख्रिश्चन आदी सर्व जाती धर्माचे ते राज होते. मुस्लीम समाजा विषयी त्यांना विशेष आस्था होती. हिंदुस्थानातील हिंदू आणि मुस्लीम समाजात परस्पराविषयी विश्वासाची व सामंजस्याची भावना राहावी हि त्यांची प्रामाणिक इच्छा होती. इ.स. १८९३ मध्ये मुंबईत प्रथम हिंदू — मुस्लीमांच्यात जातीय दंगली झाल्या. नंतरच्या पुढील वर्षी इ.स. १८९४ मध्ये पुणे येथे गणेश उत्सवात त्यांचे पडसाद उमटले. पुण्यात दंगली होवून उभय समाजातील संबंध तनावग्रस्त झाले तेंव्हा लोकमान्य टिळकांनी हिंदूची बाजू घेतली व तत्कालीन सरकारने टिळकांच्यावर खटले भरले. याच पार्श्वभूमीवर पुण्याच्या सार्वजनिक सभेने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा सत्कार पुण्यात घडवून आणला होता. त्यावेळेस त्यांनी हिंदू—मुस्लीम समाजा मध्ये शांततेचा समेट घडवून आणवा म्हणून सल्ला दिल्याची नोंद आढळते



AnyScanner
CamScanner

तत्कालीन समाजव्यवस्थेत ब्राम्हण एक जात सोडल्यास मराठा व इतर तत्सम जाती,लिंगायत,जैन,मुस्लीम अशा सर्वच जाती मागासलेल्या होत्या. जो पर्यंत त्यांच्यात शिक्षणाची आवड निर्माण होणार नाहि तो पर्यंत तो समाज मागासलेलाच राहणार असे त्यांना वाटत होते. तसेच मुस्लीम समाज शिक्षणा बाबत खूप मागासलेला होता. त्यांच्यात शिक्षणाची आवड निर्माण व्हावी म्हणून त्यांनी कोल्हापूर येथे स्थापन केलेल्या व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग मध्ये दहा मुस्लीम विद्यार्थ्यांना प्रवेश देवून मुस्लीम समाजाच्या उन्नती साठी त्यांनी प्रयत्न केले. इ.स. १९०६मध्ये मुस्लीम समाजातील प्रतिष्ठीत मंडळीची सभा बोलवून मोहमेडन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. तसेच त्यांनी मुस्लीम बोर्डिंग सुरू केले. त्यांनी एका देवस्थानच्या उत्पनाचा भाग दुसऱ्या देवस्थाना साठी खर्च करण्याचे आदेश काढल्याचे दिसून येते. पाटगावच्या मौनी बुवा मठाच्या उत्पनातील काही रक्कम तेथील मुस्लीमांच्या मशिदीच्या बांधकाम खर्चासाठी मदत म्हणून देण्याचा एक हुकूम काढल्याचे दिसून येते. छत्रपती शिवजी महाराजा प्रमाणे छत्रपती शाहू महाराजांनी देखील परधर्मिय म्हणून मुस्लीमांचा कधीच तिरस्कार केला नाही उलट त्यांच्या धर्मा विषयी अदर बाळगला कुराण हा धर्मग्रंथ आरबी भाषेत असल्याने त्याचा अर्थ सामान्य मुस्लीमांना कळत नव्हता. कुराणतील धर्मतत्वाचा अर्थबोध सामान्य मुस्लीमांना समजावा म्हणून त्यांनी मराठीत भाषान्तर करण्याचे काम सुरू केले होते. त्या साठी कोल्हापूर संस्थानाने मोठी रक्कम खर्ची घातली होती.पण दुर्दैवाने महाराजांच्या अकाली निधनाने हे काम पुर्ण झाले नाही. महाराजांच्या या उपक्रमावर भाष्य करताना हुसेन जमादारांनी म्हंटले आहे “कुराणाचे भाषांतर वेळीच पुर्ण झाले असते तर मुस्लीम सुधारणावादी प्रवाह फार अधी कोल्हापूरातून सुरू झाला असता”

शाहू महाराजांनी आपल्या कारकिर्दीत मुस्लीम समाजातील बांधवा साठी मशिदीला अर्थसाहाय्य व रिकाम्या जागा दिल्याचे अनेक दाखले दिलेले दिसून येतात. कोल्हापूर शहर वाढले जात होते अनेक नवीन पेठा वसविल्या जात होत्या. नव्या वसाहतीमध्ये मुस्लीम लोंकाची नमाज पडण्याची मोठी गैर सोय होत असे. नव्याने वसविलेल्या शाहूपूरी या पेठेत मशीदच नव्हती.तेव्हा तेथील मुस्लीमांची कुचंबना होऊ नये म्हणून शाहू महाराजांनी शाहूपुरी या पेठेत जागातर दिलीच पण मशिदीच्या बांधकामा साठी एक हजारहून अधिक रक्कम मंजूर करून दिली. तसेच त्यांनी कोल्हापूरातील बोहरी या सदन



AnyScanner
CamScanner

मुस्लीम व्यापार जातीला देखील मदत केली आहे. त्यांना नमाज पडण्यासाठी स्वत:ची मशिद नव्हती. तेंव्हा बोहरीचे पुढारी तय्यबअल्ली यांनी महाराजांना साहाय्यांची विनंती केली.महाराजांनी कृपावंत होवून शहराच्या मध्यवस्तीत ५ हजार चौ.फुटाची जागा बोहरीच्या मशिदी साठी बहाल केली. शाहू महाराजांनी राधानगरी हे नगर नव्याने वसाविले होते. हे नगर वसवीत असताना त्यांनी प्रजाजनांच्या भौतिक गरजा बरोबर धार्मिक गरजाकडे लक्ष दिले. त्यांनी हिंदूंच्या साठी दोन मंदिरे बांधली. आणि मुस्लीमांच्यासाठी 'हजरत पीर गैबीसाहेब' आणि 'शहाज महाल' ही दोन देवस्थाने निर्माण केली. इ.स. १९१७ मध्ये मुस्लीम समाजाच्या हिताच्या रक्षणासाठी दोन हुकूम काढले. पहिल्या हुकूमान्वये महाराजांनी जाहिर केले कि " मुसलमान लोकांत त्यांचे काजी खेरीज कोणी लग्न लावण्यास हरकत नाही; पण कोर्टात काम पडल्यास काजीने लग्न लाविले असले, असल्याखेरीज कायदेशीर हक्क मानला जाणार नाही.सर्व ऑफिसाकडे सदर हुकूमाची समज मिळणे करिता कळविण्यात यावी व गॅझेट मध्ये प्रसिद्धही करावी ५ जून १९१७ " काझी अथवा मौलवी याने लावलेल्या लग्नास कायदेशीर पणा प्राप्त व्हावा, म्हणून त्यांच्या जवळ असलेल्या लग्नाच्या रजिस्टरवर ' हुजूर ऑफिसचा सही व शिक्का' घेण्याची सक्ती करणारा दुसरा हुकूम महाराजांनी लवकरच जारी केला. त्यात म्हंटले होते:" मुसलमान लोकांत म्हणजे सुन्नी पंथाच्या लोकांत,मलकापूर,बावडा, कागल,करवीर व तोरगल वैगरे ठिकांनी जे काझी हल्ली आहेत ते त्यांच्या ठरलेल्या हद्दीत लग्ने लावीत आले आहेत.त्या सर्वांनी लावलेली लग्ने कायदेशीर समजली जातील. त्याचप्रमाणे त्यांच्याकडून त्यांच्या हद्दीत लग्न लावण्यास अधिकार मिळाला त्या मुल्लानी वगैरे व त्यांच्या गुमास्त्यांनी लावलेली लग्ने हि कायदेशीर समजले जातील. प्रत्येक काजी व त्यांच्या गुमास्त्यांने लग्नासंबंधाने रजिस्टर ठेवून त्यात प्रत्येक लग्न नोंदविले पाहिजे.सदरच्या रजिस्टरचा नमुना ज्यांचा पुर्वी ठरला असेल तसे त्यांनी रजिस्टर जरूरीपुरत्या पानांचे तयार करून त्या वर हुजूर ऑफिसचा शिक्क व सही करून घ्यावी. रजिस्टर मध्ये नोंदविलेले प्रत्येक लग्न कोर्टातील काम चालविण्यास वगैरे कायदेशिर पुरावा समजला जाई.या शिवाय इतर लग्ने कायदेशीर मानली जाणार नाहीत ९ जुलै १९७०."महाराजांनी मुसलमान धर्मगुरूंचा लग्न लावण्याचा अधिकार मान्य केला , त्यात काहीही हस्तक्षेप केला नाही; पण अशी लग्ने लावली गेल्यावर त्याच्या रजिस्टरवर सरकारी नोंदीचे



AnyScanner
CamScanner

कायदयाचे बंधन केले गेले. ही गोष्ट मुस्लिमांच्या,विशेषत: मुस्लिम स्त्रियांच्या दृष्टीकोणातून अधिक हिताची होती.

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात मुस्लिम गुणीजनांना राजश्रय दिलेला होता. शाहिर लहरी हैदर , चित्रकलेच्या क्षेत्रातील महान कलावंत रंगसम्राट अबालाल रहिमान , आखिल हिंदूस्थान मध्ये आपल्या असामान्य गायिकीने ख्यातकीर्त झालेले गान महर्षी अल्लादिया खॉसाहेब, खुद्द महाराजांना मल्लविद्येचे ज्ञान देणारे मल्लविशारद बालेखान वस्ताद हे प्रमुख होते. शाहिर लहरी हैदर तर महाराजांच्या गळयातील ताईत बनले होते. महाराजांच्या बरोबर त्यांचे जे नित्यांचे सहकारी बसत असत त्यापैकि हैदरसाहेब एक होते. वृत्तीने आवलीया बनलेल्या आबालाल रहिमानसारख्या असामान्य कलावंताची लहर महाराजांनी मोठया आनंदानी सांभाळली होती. अल्लादिया खॉसाहेबावर त्यांनी बंधुप्रेमाचा वर्षाव केला होता. तर बालेखान वस्तादला त्यांनी दरबारी मानकऱ्यांत स्थान देवून त्यांची प्रतिष्ठ उंचावली होती. या सर्व गुणीजनांना कोल्हापूर दरबारात केवळ राजश्रय लाभला होता असे नाही,तर कोल्हापूरच्या राजाची लाखमोलाची मायाही मिळाली होती. या मायेपुढे जगातील कोणताही सन्मान त्यांना फिका वाटत होता. त्यामुळेच अल्लादिया खॉसाहेब यांनी हिंदूस्थानातील सर्वश्रेष्ठ गायक म्हणून मान्यता मिळाल्यावरही कोल्हापूर सारख्या संस्थानाकडे पाठ फिरवली नाही. शाहू महाराजांची अजन्म सेवा करण्यातच धन्याता मानली.

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात हिंदू—मुस्लीम ऐक्याची आदर्श परंपरा निर्माण केली होती. मुंबई इलाख्यात मुंबई, पुणे आदी ठिकाणी गोवधबंदी चळवळी सारख्या बाबींनी अथवा गणेश उत्सव सारख्या उत्सवाच्या निमित्तांने हिंदू—मुस्लीम समाजात तणाव निर्माण होत होते. त्याची परिणती अनेकदा दंगलीत होत होती. या पार्श्वभूमीवर कोल्हापूर संस्थानात शाहू महाराजांनी ' गोवधबंदीचा कायदा अंमलात आणूनही उभय समाजांत कधी दंगलीतर झाल्या नाहितच पण तणावही निर्माण झाले नाहित.एवढेच नव्हे तर मुस्लीमांच्या मोहरमध्ये हिंदू मोठया उत्साहने भाग घेत होते. गणेश उत्सव व मोहरम हे सण एकाच वेळी येत. तेव्हा कोल्हापूरातील तालमी सारख्या सार्वजनिक ठिकाणी गणेश मुर्ती व मोहरमचे पंजे एकत्र बसवले जात असत. हिंदू—मुस्लीम ऐक्याच्या परंपरा शाहू महाराजांनी निर्माण केल्या आणि त्या परंपरा करवीरच्या लोकांनी निष्ठेने व अभिमानाने जतन केल्या आहेत. या

परंपरामुळेच महाराजांनंतरच्या स्वातंत्र्यपूर्व कालखंडातच नव्हे तर स्वातंत्र्योत्तर कालखंडातही देशात हिंदू—मुस्लीम समाजात दंगलींचे डोंब उसळले तरी कोल्हापूरला त्याची झळ पोहचली नाही. कोल्हापूरने हिंदू—मुस्लीम सद्भावनेचा आदर्श टिकवून ठेवलेला आहे.

**मुल्यमापन:—**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाचा चौफेर विकास घडवून आणलेला दिसून येतो. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपल्या शैक्षणिक,सामाजिक व आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करून त्यांची सार्वगीण प्रगती घडवून आणलेली दिसून येते. राजर्षी छत्रपती शाहू महाराज मराठा संस्थानिक असले तरी ते मराठयांचे राजे नव्हते. त्यांच्या संस्थानात असलेल्या हिंदू,जैन,मुस्लीम,पारशी,ख्रिश्चन आदी सर्व जाती धर्माचे ते राजे असलेले दिसून येतात. मुस्लीम समाजा विषयी त्यांना विशेष आस्था होती. त्यांनी मुस्लीम समाजाच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिलेले दिसून येते.त्यांनी कोल्हापूर संस्थानात मुस्लिम समाजात काजीला लग्न लावण्याचा कायदेशीर अधिकार दिलेला दिसून येतो. त्यांनी आपल्या संस्थानात अनेक मुस्लिम कलावंतांनाही राजश्रय दिलेला दिसून येतो. तसेच त्यांनी आपल्या संस्थानात हिंदू—मुस्लीम ऐक्याची परंपरा निर्माण केलेली दिसून येते.

**संदर्भ ग्रंथसूची**


१)पवार जयसिंगराव, राजर्षीशाहू स्मारक ग्रंथ,महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी,कोल्हापूर, २००७

२) साळुंखे, नानासाहेब, शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर,२००८

३) किर धनंजय,प्रेषित राजर्षी शाहू छत्रपती,शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अयोजित व्याख्यान , कोल्हापूर

४) साटम, द,ना,आधुनिक भगीरथ राजर्षी शाहू, त्रीवेणी प्रकाशन, मुंबई,१९८६

५) बागल, माधवराव, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, यशदा प्रकाशन, मुंबई,१९६९

६) कठारे, अनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कल्पना प्रकाशन , नांदेड, २००८

७)जोशी, तर्कतीर्थ श्री लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,१९९५





AnyScanner

CamScanner